मराठी

## कृषि कर्ज माफी आणि कर्जासंबंधीची मदत योजना, २००८

१. **ओळख :**

१.१ अर्थमंत्र्यांनी त्यांच्या २००८-२००९ च्या अर्थसंकल्पाच्या भाषणात शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी आणि कर्जासंबंधीची मदत या योजना जाहीर केल्या.

१.२ या योजनेच्या अंमलबजावणीसाठी असलेली मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

२. **व्याप्ती :**

२.१ या मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे शेड्यूल्ड कमर्शियल बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी पत संस्था (नागरी सहकारी बँकांसह) आणि स्थानिक प्रदेश बँका (इथून पुढे [illegible] उल्लेख **कर्जपुरवठादार संस्था** असा केला आहे.) यांनी **अत्यल्प व अल्पभूधारक** व इतर शेतकऱ्यांना दिलेल्या थेट कर्जांचा समावेश होतो.

२.२ ही योजना तात्काळ अंमलात येईल.

३. **व्याख्या :**

३.१ **थेट कृषि कर्ज** म्हणजे शेतकऱ्यांना शेतीसाठी थेटपणे दिलेली लघु मुदतीची उत्पादन कर्जे आणि गुंतवणूक कर्जे. यामध्ये विशिष्ट शेतकऱ्यांच्या गटांना थेट देण्यात आलेल्या अशा कर्जांचाही समावेश होईल (उदा. स्वयं सहायता गट आणि संयुक्त जबाबदारी गट), मात्र त्या-त्या गटातील प्रत्येक शेतकऱ्याला देण्यात आलेल्या कर्जाचे स्वतंत्र तपशील बँकांनी ठेवणे आवश्यक आहे.

३.२ **लघु मुदतीचे उत्पादन कर्ज** म्हणजे पीक घेण्यासाठी देण्यात आलेले कर्ज. या कर्जाची परतफेड १८ महिन्यांमध्ये करायची असते. या कर्जामध्ये पारंपरिक व अपारंपरिक लागवडी व [illegible] दिलेल्या खेळत्या भांडवलाच्या स्वरूपातील रु. १.०० लाखापर्यंतच्या कर्जांचा समावेश होतो.

३.३ **गुंतवणूक कर्ज** म्हणजे

(अ) [illegible] किंवा त्याच्या जागी दुसरी मालमत्ता आणणे यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी दिले जाणारे थेट शेतीचे कर्ज आणि जमिनीतून मिळणारे उत्पादन वाढवण्यासाठी, म्हणजेच विहिरी खोल करणे, नव्या विहिरी खणणे, पंप सेट बसवणे, ट्रॅक्टर / बैलजोडी खरेदी, जमिनीचा विकास या स्वरूपाची कामे करण्यासाठी केलेली भांडवली गुंतवणूक आणि पारंपरिक व

अपारंपरिक लागवडी व फळोत्पादनासाठी घेतलेले मुदतीचे कर्ज, यासाठी असलेली गुंतवणूक विषयक कर्जे, आणि

(३) शेतीपूरक व्यवसाय म्हणजेच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, बकरी पालन, मेंढीपालन, वराहपालन, मत्स्यपालन, मधुमक्षिकापालन, हरितगृहे आणि जैववायू - बायोगॅस - अशा उपक्रमांसंबंधीच्या मालमत्तेचे संपादन करण्यासाठी गुंतवणूक विषयक कर्जे.

२.४ **सहकारी पत संस्था** म्हणजेच सहकारी संस्था, म्हणजेच

अ) अशी संस्था शेतकऱ्यांना अल्प मुदतीसाठी पिक कर्ज देते आणि केंद्र सरकारकडून व्याज अनुदान मिळण्यास पात्र असते; किंवा

ब) रिझर्व बँक ऑफ इंडिया किंवा नाबार्ड (नॅशनल बँक फॉर अॅग्रीकल्चर रिसर्च अँड डेव्हलपमेंट) यांच्यातर्फे नियंत्रित किंवा देखरेख केले जात असलेले बँकींग व्यवहार करते; किंवा

क) अशी संस्था राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशामध्ये, अल्प-मुदत सहकारी पत रचनेचा किंवा दीर्घ-मुदत सहकारी पत रचनेचा भाग असते.

२.५ **अत्यल्पभूधारक शेतकरी** म्हणजे १ हेक्टरपर्यंत (२.५ एकर) जमीन कसणारा (मालक म्हणून किंवा कुळ म्हणून किंवा खंडाने करणारा) शेतकरी

२.६ **अल्पभूधारक शेतकरी** म्हणजे १ हेक्टरपेक्षा जास्त आणि २ हेक्टरपर्यंत (५ एकर) जमीन कसणारा (मालक म्हणून किंवा कुळ म्हणून किंवा खंडाने करणारा) शेतकरी

२.७ **इतर शेतकरी** म्हणजे २ हेक्टरपेक्षा जास्त (५ एकरापेक्षा जास्त) जमीन कसणारा (मालक म्हणून किंवा कुळ म्हणून किंवा खंडाने करणारा) शेतकरी

**स्पष्टीकरण :**

१. या योजनेप्रमाणे उपरोल्लेखित जमीनमालकीच्या निकषानुसार पात्र शेतकऱ्याचे वर्गीकरण हे, कर्ज मंजूर करतेवेळी, नंतर मालकी किंवा ताबा यात बदल झाला तरी, मालक शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनीचे एकूण प्रमाण - व्यक्तिशः अथवा संयुक्त मालकी (मालक-शेतकऱ्यांच्या बाबतीत) किंवा शेतकरी कसत असलेल्या जमिनीचे एकूण प्रमाण (कुळ म्हणून किंवा खंडाने करणारा), यावर आधारित असेल.

२. एकापेक्षा अधिक शेतकरी त्यांच्या मालकीच्या जमिनीचा गट करून कर्ज घेणार असतील तर **अत्यल्पभूधारक शेतकरी** किंवा **अल्पभूधारक शेतकरी** किंवा इतर **शेतकरी** म्हणून त्या गटातील सगळ्या शेतक-यांचे वर्गीकरण करण्यासाठी त्या गटातील सगळ्यात मोठी जमीन मालकी ही आधारभूत असेल.

३. शेतीपूरक व्यवसायासाठी गुंतवणूक विषयक कर्ज मिळालेल्या शेतक-यांच्या बाबतीत, मुद्दल कर्ज रक्कम रु. ५०,०००/- पेक्षा जास्त नसेल तर अशा वेळी तो शेतकरी **अल्पभूधारक शेतकरी आणि अत्यल्पभूधारक शेतकरी** म्हणून वर्गीकृत होईल आणि मुद्दल रक्कम रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असेल तर **इतर शेतकरी** म्हणून त्यांचे वर्गीकरण केले जाईल. येथे बाबतीत जमीन मालकीचा विचार होणार नाही.

४. किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत घेतलेले थेट कृषि कर्जही या योजनेमध्ये समाविष्ट होईल आणि हे सर्व मार्गदर्शक तत्त्वांवर अवलंबून असेल.

५. एखाद्या शेतक-याने अल्प मुदतीचे उत्पादन कर्ज आणि गुंतवणूक विषयक कर्ज दिलेले असेल तर ती दोन वेगळी कर्जे म्हणून ओळखली जातील आणि ही योजना दोन्ही कर्जांना स्वतंत्रपणे लागू होईल. त्याप्रमाणे दोन वेगवेगळ्या हेतूसाठी दोन गुंतवणूक कर्जे घेणा-या शेतक-यांच्या बाबतीतही दोन्ही कर्जे दोन स्वतंत्र कर्जे म्हणून ओळखली जातील आणि ही योजना दोन्ही कर्जांना स्वतंत्रपणे लागू होईल.

४. **पात्र रक्कम :**

४.१ कर्ज माफी किंवा कर्जासंबंधीची मदत, जे काय असेल ते, यासाठी असलेल्या पात्र रकमेत (येथून पुढे ती रक्कम **पात्र रक्कम** म्हणून ओळखली जाईल) पुढील प्रकारांचा समावेश होतो.

४.२ अल्प-मुदतीच्या उत्पादन कर्जांच्या बाबतीत असलेली कर्ज रक्कम (लागू असलेल्या व्याजासह)

(क) मार्च ३१, २००७ पर्यंत दिलेली व ३१ डिसेंबर, २००७ रोजी थकीत असलेली आणि फेब्रुवारी २९, २००८ पर्यंत भरायची राहिलेली

(ख) मुदत उलटलेली (थकीत) असो वा नसो, केंद्र सरकारकडून घोषित झालेल्या विशेष योजनेद्वारे २००४ आणि २००६ मध्ये पुनर्रचना व पुनर्योजित झालेली; आणि

(ग) मुदत उलटलेली (थकीत) असो वा नसो, नैसर्गिक आपत्तींमुळे, लागू असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे मार्च ३१, २००७ पर्यंत सर्वसाधारण प्रकारे पुनर्रचना व पुनर्योजित झालेली

४.३ गुंतवणूक कर्जांच्या बाबतीत, मुदत उलटलेले (थकीत) अशा कर्जांचे हप्ते (असे हप्त्यांवर लागू असलेल्या व्याजासह), जर ही कर्जे पुढीलप्रमाणे असतील तर

(२) मार्च ३१, २००७ पर्यंत दिलेली व ३१ डिसेंबर, २००७ला थकीत असलेली आणि फेब्रुवारी २९, २००८ पर्यंत भरायची राहिलेली;

(३) केंद्र सरकारकडून घोषित झालेल्या विशेष योजनेद्वारे २००४ आणि २००६ मध्ये पुनर्रचना व पुनर्योजित झालेली ; आणि

(४) नैसर्गिक आपत्तींमुळे, लागू असलेल्या रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे मार्च ३१, २००७ पर्यंत सर्वसाधारण प्रकारे पुनर्रचना व पुनर्योजित झालेली

**स्पष्टीकरण :**

मार्च ३१, २००७ पर्यंत दिलेल्या आणि अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) किंवा दावा दाखल झालेले कर्ज म्हणून वर्गीकृत झालेल्या गुंतवणूक कर्जांच्या बाबतीत ३१ डिसेंबर २००७ रोजी मुदत उलटलेले (थकीत) हप्तेच केवळ **पात्र रक्कम** असतील.

४.२ पात्र रकमेमध्ये पुढील कर्जांचा समावेश होणार नाही

(अ) उभ्या पिकांव्यतिरिक्त कृषी उत्पादन गहाण वा तारण असलेली कर्जे ; आणि

(ब) सहकारी पत संस्थांव्यतिरिक्त (परिच्छेद ३.५ मध्ये दिल्याप्रमाणे) औद्योगिक कंपन्या, भागीदारी फर्म, सोसायट्या आणि अन्य तत्सम संस्थांना करण्यात आलेला वित्त पुरवठा

४.३ ३१ मार्च, २००७ च्या नंतर एखाद्या कर्जपुरवठादार संस्थेकडून देण्यात आलेल्या कुठल्याही कर्जास ही योजना लागू होणार नाही.

## ५. कर्ज माफी :

५.१ अल्प किंवा अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बाबतीत संपूर्ण **पात्र रक्कम** माफ होईल.

## ६. कर्जासंबंधीची मदत :

६.१ **इतर शेतकऱ्यांच्या** बाबतीत एक वेळची समझोता दिली जाईल (वन टाइम सेटलमेंट योजना - ओटीएस) या योजनेनुसार शेतकऱ्याला **पात्र रकमेच्या** २५ टक्के सूट दिली जाईल. त्यासाठी एक अट असेल आणि ती म्हणजे त्या शेतकऱ्याने **पात्र रकमेच्या** ७५ टक्के बाकी रक्कम भरली पाहिजे.

त्यासाठी आणखी एक अट म्हणजे परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या महसूल जिल्ह्यांच्या बाबतीत **इतर शेतकऱ्यांना, पात्र रकमेच्या २५% एक वेळची सवलत किंवा रु. २०,००० या, दोन्हींपैकी जी** रक्कम जास्त असेल ती सूट दिली जाईल. त्यासाठी असलेली अट म्हणजे त्या शेतकऱ्याने **पात्र रकमेची** बाकी रक्कम भरली पाहिजे.

७. **अंमलबजावणी :**

७.१ या योजनेखालील शेड्यूल्ड कमर्शियल बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक, सहकारी पत संस्था, नागरी सहकारी बँक आणि स्थानिक प्रदेश बँकेच्या प्रत्येक शाखेने दोन याद्या तयार करावयाच्या आहेत. या याद्यांपैकी एका यादीत या योजनेनुसार कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या **अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांचा** समावेश असेल तर दुसऱ्या यादीत कर्जसंबंधाच्या मदतीसाठी पात्र असलेल्या **इतर शेतकऱ्यांचा** समावेश असेल. या यादीत जमिनीच्या मालकीचे तपशील, पात्र रक्कम आणि प्रत्येक प्रकरणात द्यावयाची म्हणून मंजूर झालेली कर्जमुक्तीची वा कर्जसंबंधीची मदत करावयाची रक्कम यांचा या यादीत समावेश असेल. या याद्या बँक / सोसायटीच्या नोटीस बोर्डावर ३० जून, २००८ रोजी वा त्या आधी लावल्या जातील.

७.२ **अल्पभूधारक शेतकरी** किंवा **अत्यल्पभूधारक** शेतकरी म्हणून वर्गीकरण झालेला शेतकरी, माफी मिळालेल्या पात्र रकमेनंतर पुन्हा नव्या कृषि कर्जास पात्र ठरेल.

७.३ **इतर शेतकरी** म्हणून वर्गीकरण झालेल्या आणि (वन टाईम सेटलमेंट स्कीम) ओटीएस मदतीसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना त्यांचा हिस्सा (म्हणजेच पात्र रक्कम वजा ओटीएस मदतीची रक्कम) जास्तीत जास्त तीन हप्त्यात भरणे मान्य असल्याची हमी द्यावी लागेल. त्यापैकी दोन हप्त्यांची रक्कम त्यांच्या हिश्श्याच्या एक तृतीयांशापेक्षा कमी असता कामा नये. तीन हप्त्यांबाबतीत पैसे भरण्याच्या शेवटच्या तारखा सप्टेंबर ३०, २००८, मार्च ३१, २००९ आणि जून ३०, २००९ असतील.

७.४ ही हमी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया / नाबार्ड निर्धारित करतील त्या फॉर्ममध्ये असेल.

७.५ त्या शेतकऱ्याने त्याचा हिस्सा पूर्ण भरल्यावर ओटीएस मदतीची रक्कम (म्हणजेच केंद्र सरकारचा हिस्सा) त्या **इतर शेतकऱ्याच्या** खात्यावर जमा केली जाईल.

७.६ अल्प-मुदतीच्या उत्पादन कर्जाच्या बाबतीत, **इतर शेतकऱ्याने** त्याच्या हिश्श्यापैकी एक तृतीयांश हिस्सा भरला की तो नव्या अल्प-मुदतीच्या उत्पादन कर्जास पात्र होईल.

७.७ गुंतवणूक कर्जाच्या बाबतीत (थेट शेतीला कर्ज अथवा शेतीपूरक व्यवसायासाठी), इतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा पूर्ण भरला की तो नव्या गुंतवणूक कर्जास पात्र ठरेल.

७.७ शेड्यूल्ड कमर्शियल बँका, नागरी सहकारी बँका आणि स्थानिक प्रदेश बँकांच्या बाबतीत या योजनेच्या अंमलबजावणीसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही प्रधान माध्यम संस्था राहील. प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी पत संस्था यांच्या बाबतीत नाबार्ड ही प्रधान माध्यम संस्था असेल.

## ८. व्याज आणि इतर शुल्क

८.१ फेब्रुवारी २९, २००८ नंतर कोणत्याही कालावधीसाठी कर्जपुरवठा संस्था **पात्र रकमेवर** कोणतेही व्याज आकारणार नाहीत. तरीसुद्धा **पात्र रकमेचा** आपला हिस्सा जो **इतर शेतकरी** ३० जून, २००९ रोजी किंवा आधी भरण्यात कसूर करेल आणि ओटीस संबंधीच्या मदतीस अपात्र ठरेल, त्याला बँक ३० जून, २००९ नंतरच्या कालावधीसाठी व्याज आकारेल.

८.२ ३१.३.२००७ नंतर मुदत उलटलेल्या गुंतवणूक कर्जाचे हप्ते कर्जपुरवठा संस्थाकडून लागू असलेल्या व्याजासह वसूल करण्यात येतील. तरीसुद्धा योग्य त्या प्रकरणांच्या बाबतीत या कर्जपुरवठादार संस्था संबंधित संस्थांच्या सर्वसाधारण धोरणानुसार या हप्त्यांची पुनर्योजना करु शकतील.

८.३ या योजनेत काहीही समाविष्ट असले तरीसुद्धा या योजनेनुसार केन्द्र सरकारकडून कर्जपुरवठादार व्याजदराच्या रकमेची जी भरपाई घेऊ पाहतील, ती कोणत्याही परिस्थितीत कर्जाच्या मुद्दल रकमेपेक्षा जास्त असता कामा नये.

८.४ शेतकरी किंवा केन्द्र सरकारकडून कर्जपुरवठादार संस्था, व्याज आणि इतर आकार मागणार नाहीत या बाबतीत वित्त मंत्रालय कर्जपुरवठादार संस्थांना सर्व प्रासंगिक व संलग्न बाबींसंबंधी ही पूरक सूचना देईल.

## ९. कर्ज माफी किंवा कर्जसंबंधीच्या मदतीचे प्रमाणपत्र

९.१ अल्प आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बाबतीत पात्र रकमेची माफी मिळाल्यावर कर्ज माफ झाले असे एक प्रमाणपत्र कर्जपुरवठादार संस्था देतील आणि ज्या पात्र रकमेची माफी मिळाली असेल त्याचा विशेष उल्लेख त्या प्रमाणपत्रात करतील.

९.२ **इतर शेतकऱ्यांच्या** बाबतीत ओटीएस संबंधीची मदत दिल्यावर कर्जाचा हिशेब कर्जपुरवठा संस्थांच्या नियमाप्रमाणे चुकता झाल्याचे प्रमाणपत्र या संस्था देतील आणि पात्र रक्कम, शेतकऱ्याकडून त्याचा हिस्सा म्हणून भरण्यात आलेली रक्कम आणि ओटीएस संबंधीची मदत त्या बाबींचा विशेष उल्लेख करतील.

९.३ हे प्रमाणपत्र आरबीआय / नाबार्ड यांनी निर्धारित केलेल्या फॉर्ममध्ये असेल आणि ते प्रमाणपत्र दिल्यावर कर्जपुरवठादार संस्था शेतकऱ्याकडून पोच घेतील.

## १०. कर्जपुरवठादार संस्थावरील बंधने

१०.१ या योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांच्या याद्यांची अचूकता आणि प्रामाणिकपणा, तसेच प्रत्येक शेतकऱ्याला दिलेल्या कर्ज माफी व कर्जासंबंधीच्या मदतीचे तपशील यासाठी प्रत्येक कर्जपुरवठा संस्था जबाबदार असेल. या योजनेसाठी कर्जपुरवठा संस्थेकडून देण्यात आलेले प्रत्येक प्रमाणपत्र, तयार केलेली प्रत्येक यादी आणि जतन केलेल्या प्रत्येक कागदपत्रावर कर्जपुरवठा संस्थेच्या अधिकृत अधिकाऱ्याची सही व पद असेल.

१०.२ प्रत्येक कर्जपुरवठादार संस्था प्रत्येक राज्यासाठी (त्या राज्यातील शाखांची संख्या विचारात घेऊन) एक किंवा अधिक तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करेल. त्या संबंधित तक्रार निवारण अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता कर्जपुरवठादार संस्थेच्या प्रत्येक बँकेच्या दर्शनी भागात लावला जाईल. तक्रार निवारण अधिकाऱ्याला अन्यायग्रस्त शेतकऱ्याचे निवेदन स्विकारण्याचा व त्यानुसार योग्य ते आदेश देण्याचा अधिकार आहे.

१०.३ आपले नाव परिच्छेद ५.६ मध्ये दिलेल्या दोन्ही याद्यांमध्ये समाविष्ट झाले नसल्याच्या कारणावरून किंवा आपले नाव चुकीच्या यादीत समाविष्ट झाले असल्याच्या कारणावरून किंवा आपल्याला मंजूर झालेल्या रकमेचा गणना चुकीच्या पद्धतीने झाल्याच्या कारणावरून एखाद्या शेतकऱ्यावर अन्याय झाला असेल तर त्याला ज्या बँकेकडून कर्ज मिळाले आहे, त्या बँकेद्वारे किंवा संबंधित कर्जपुरवठादार संस्थेच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे थेट निवेदन सादर करता येईल आणि अशा स्वरूपाची निवेदने मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत ती निकालात काढली जातील.

## ११. हिशेब तपासणी

या योजनेनुसार कर्जमाफी किंवा कर्जासंबंधीची मदत मंजूर करणाऱ्या प्रत्येक कर्जपुरवठादार संस्थेचे हिशेब (बुक्स ऑफ अकौंट्स), आरबीआय / नाबार्ड निर्धारित करतील त्या कार्यपद्धतीला अधीन राहतील. हा हिशेब, सुरुवातीला हिशेब परीक्षक, वैधानिक हिशेब परीक्षक किंवा विशेष हिशेब परीक्षकांकडून आरबीआय / नाबार्ड निर्देशित करतील त्याप्रमाणे आयोजित केला जाईल.

## १२. प्रसिद्धि

१२.१ या योजनेच्या तीन प्रती प्रत्येक कर्जपुरवठादार संस्थेच्या प्रत्येक शाखेत या योजनेची एक इंग्रजी आणि त्या राज्याच्या / केंद्रशासित प्रदेशाच्या भाषेतील वा भाषांमधील एक प्रत दर्शनी भागी लावली जाईल.

१२.२ या योजनेची एक प्रत वित्त मंत्रालय, वित्त सेवा विभाग, आरबीआय आणि नाबार्ड यांच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

## १३. अन्वयार्थ आणि अडचणी दूर करण्याचे अधिकार

१३.१ या योजनेतील कोणताही परिच्छेद किंवा त्याद्वारे दिलेल्या कोणत्याही सूचनांच्या अन्वयार्थाबद्दल काही शंका उपस्थित झाली तर केंद्र सरकार त्या शंकेचे निरसन करेल आणि केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

१३.२ या योजनेतील तरतुदी किंवा त्यातील कुठली सूचना प्रत्यक्षात आणण्यात काही अडचण उद्भवली तर ती अडचण दूर करण्याच्या हेतूने केन्द्र सरकार योग्य ते आदेश देऊन तातडीने आणि आवश्यक वाटेल ते कोणतेही उपाय करेल.

## १४. देखरेख

या योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील देखरेख समिती स्थापन करण्यात येईल. या समितीत पुढील पदाधिकारी समाविष्ट असतील.

१. सचिव, वित्त सेवा, वित्त मंत्रालय - अध्यक्ष
२. सचिव, कृषि व सहकार खाते, कृषि मंत्रालय
३. डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व बँक ऑफ इंडिया
४. अध्यक्ष, नाबार्ड
५. दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
६. दोन प्रादेशिक ग्रामीण बँकांचे अध्यक्ष
७. दोन राज्य पातळीवरील सहकारी बँकांचे व्यवस्थापकीय संचालक

---

टिप - कुठल्याही विवादाच्या स्थितीत इंग्रजी मसौदा ग्राह्य धरला जाईल

(मार्गदर्शक तत्वांना असलेले) परिशिष्ट १

## डीएडीपी, डीडीपी प्रदेश असलेले महसुल जिल्हे आणि पंतप्रधानांची विशेष मदत योजना असलेले जिल्हे

| राज्य | अनुक्रमांक | डीएडीपी, डीडीपी आणि पंतप्रधानांची मदत योजना असलेले जिल्हे | |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १ | १. | आदिलाबाद |
| | २ | २. | चित्तूर |
| | ३ | ३. | कडप्पा |
| | ४ | ४. | खम्माम |
| | ५ | ५. | कर्नूल |
| | ६ | ६. | मेडक |
| | ७ | ७. | मेहबूबनगर |
| | ८ | ८. | नळगोंडा |
| | ९ | ९. | प्रकासम |
| | १० | १०. | रंगारेड्डी |
| | ११ | ११. | श्रीकाकुलम |
| | १२ | १२. | अनंतपूर |
| | १३ | १३. | वरंगळ |
| | १४ | १४. | गुंटूर |
| | १५ | १५. | करीमनगर |
| | १६ | १६. | नेल्लूर |
| | १७ | १७. | निझामाबाद |
| बिहार | १८ | १. | भभूआ |
| | १९ | २. | जमुई |
| | २० | ३. | मधुबानी |
| | २१ | ४. | नवादह |
| | २२ | ५. | रोहतास |
| | २३ | ६. | सितामढ़ी |
| छत्तीसगढ | २४ | १. | बस्तर |
| | २५ | २. | बिलासपूर |
| | २६ | ३. | दांतेवारा |
| | २७ | ४. | दुर्ग |
| | २८ | ५. | जंजगीर-चांपा |
| | २९ | ६. | कवर्धाम |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३० | ७. | कोरबा |
| | ३१ | ८. | राजनंदगांव |
| गुजरात | ३२ | १. | अहमदाबाद |
| | ३३ | २. | अमरेली |
| | ३४ | ३. | भरुच |
| | ३५ | ४. | भावनगर |
| | ३६ | ५. | दाहोद |
| | ३७ | ६. | डांग |
| | ३८ | ७. | जुनागढ |
| | ३९ | ८. | नर्मदा |
| | ४० | ९. | नवसारी |
| | ४१ | १०. | पान्च महाल |
| | ४२ | ११. | पोरबंदर |
| | ४३ | १२. | साबरकांठा |
| | ४४ | १३. | वडोदरा |
| | ४५ | १४. | वलसाड |
| | ४६ | १५. | बनासकांठा |
| | ४७ | १६. | जामनगर |
| | ४८ | १७. | कच्छ |
| | ४९ | १८. | पाटण |
| | ५० | १९. | राजकोट |
| | ५१ | २०. | सुरेंद्रनगर |
| हरियाणा | ५२ | १. | भिवानी |
| | ५३ | २. | फतेहबाद |
| | ५४ | ३. | हिस्सार |
| | ५५ | ४. | झहार |
| | ५६ | ५. | मोहिंदरगढ |
| | ५७ | ६. | रेवारी |
| | ५८ | ७. | सिरसा |
| हिमाचल प्रदेश | ५९ | १. | बिलासपूर |
| | ६० | २. | सोलन |
| | ६१ | ३. | ऊना |
| | ६२ | ४. | किन्नूर |
| | ६३ | ५. | लाहौल व स्पिती |
| जम्मू व काश्मीर | ६४ | १. | डोडा |
| | ६५ | २. | उधमपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| | ६६ | ३. | रामबन |
| | ६७ | ४. | किश्तवार |
| | ६८ | ५. | रिसी |
| | ६९ | ६. | कारगील |
| | ७० | ७. | लेह |
| झारखंड | ७१ | १. | बोकारो |
| | ७२ | २. | छत्र |
| | ७३ | ३. | देवघर |
| | ७४ | ४. | धनबाद |
| | ७५ | ५. | दुमका |
| | ७६ | ६. | गरवाह |
| | ७७ | ७. | गोड्डा |
| | ७८ | ८. | हजारीबाग |
| | ७९ | ९. | जामताग |
| | ८० | १०. | कोदरमा |
| | ८१ | ११. | लातेहर |
| | ८२ | १२. | पाकूर |
| | ८३ | १३. | पालमाव |
| | ८४ | १४. | सहैबगंज |
| कर्नाटक | ८५ | १. | बंगलोर ग्रामीण |
| | ८६ | २. | बेळगांव |
| | ८७ | ३. | बिदर |
| | ८८ | ४. | चामराज नगर |
| | ८९ | ५. | चिकमगलूर |
| | ९० | ६. | चित्रदुर्ग |
| | ९१ | ७. | दावणगेरे |
| | ९२ | ८. | धारवाड |
| | ९३ | ९. | गदग |
| | ९४ | १०. | गुलबर्गा |
| | ९५ | ११. | हसान |
| | ९६ | १२. | हवेरी |
| | ९७ | १३. | कोलार |
| | ९८ | १४. | म्हैसूर |
| | ९९ | १५. | तुमकूर |
| | १०० | १६. | कोडागु |
| | १०१ | १७. | शिमोगा |

| | | | |
|---|---|---|---|
| | १०२ | १८. | बागलकोट |
| | १०३ | १९. | बेल्लारी |
| | १०४ | २०. | विजापूर |
| | १०५ | २१. | दावणगेरे |
| | १०६ | २२. | कोप्पल |
| | १०७ | २३. | रायचूर |
| केरळ | १०८ | १. | वायनाड |
| | १०९ | २. | पलक्कड |
| | ११० | ३. | कासारगोड |
| मध्य प्रदेश | १११ | १. | बरवानी |
| | ११२ | २. | बेतूल |
| | ११३ | ३. | भिंड |
| | ११४ | ४. | छिंदवाडा |
| | ११५ | ५. | दमोह |
| | ११६ | ६. | देवास |
| | ११७ | ७. | धार |
| | ११८ | ८. | गुणा |
| | ११९ | ९. | जबलपूर |
| | १२० | १०. | झाबुआ |
| | १२१ | ११. | खांडवा |
| | १२२ | १२. | खारगाव |
| | १२३ | १३. | पन्ना |
| | १२४ | १४. | रायसेन |
| | १२५ | १५. | राजगड |
| | १२६ | १६. | रतलाम |
| | १२७ | १७. | रेवा |
| | १२८ | १८. | शाहडोल |
| | १२९ | १९. | शाजापूर |
| | १३० | २०. | शिवपुरी |
| | १३१ | २१. | सिधी |
| | १३२ | २२. | सिवनी |
| | १३३ | २३. | उमरिया |
| | १३४ | २४. | अशोकनगर |
| | १३५ | २५ | अनुप्पूर |
| महाराष्ट्र | १३६ | १. | अहमदनगर |
| | १३७ | २. | अकोला |

| | | | |
|---|---|---|---|
| | १३८ | ३. | अमरावती |
| | १३९ | ४. | औरंगाबाद |
| | १४० | ५. | बीड |
| | १४१ | ६. | बुलढाणा |
| | १४२ | ७. | चंद्रपूर |
| | १४३ | ८. | धुळे |
| | १४४ | ९. | गडचिरोली |
| | १४५ | १०. | हिंगोली |
| | १४६ | ११. | जळगांव |
| | १४७ | १२. | जालना |
| | १४८ | १३. | लातूर |
| | १४९ | १४. | नागपूर |
| | १५० | १५. | नांदेड |
| | १५१ | १६. | नंदुरबार |
| | १५२ | १७. | नाशिक |
| | १५३ | १८. | उस्मानाबाद |
| | १५४ | १९. | परभणी |
| | १५५ | २०. | पुणे |
| | १५६ | २१. | सांगली |
| | १५७ | २२. | सातारा |
| | १५८ | २३. | सोलापुर |
| | १५९ | २४. | वाशिम |
| | १६० | २५. | यवतमाळ |
| | १६१ | २६. | वर्धा |
| ओरिसा | १६२ | १. | बारगढ |
| | १६३ | २. | बोलनगीर |
| | १६४ | ३ | बौध |
| | १६५ | ४. | ढेंकानाल |
| | १६६ | ५. | कालाहंडी |
| | १६७ | ६. | नौपाडा |
| | १६८ | ७. | सोनेपूर |
| | १६९ | ८. | फुलबानी |
| राजस्थान | १७० | १. | अजमेर |
| | १७१ | २. | बंसवारा |
| | १७२ | ३. | बरन |
| | १७३ | ४. | भरतपुर |

| | | | |
|---|---|---|---|
| | १७४ | ५. | डुंगरपूर |
| | १७५ | ६. | झलवार |
| | १७६ | ७. | करौला |
| | १७७ | ८. | कोटा |
| | १७८ | ९. | सवाई माधोपूर |
| | १७९ | १०. | टोंक |
| | १८० | ११. | उदयपुर |
| | १८१ | १२. | बारमेर |
| | १८२ | १३. | बिकानेर |
| | १८३ | १४. | चूरू |
| | १८४ | १५. | हनुमान गढ |
| | १८५ | १६. | जयपूर |
| | १८६ | १७. | जैसलमेर |
| | १८७ | १८. | जल्लोर |
| | १८८ | १९. | झुनझुनू |
| | १८९ | २०. | जोधपुर |
| | १९० | २१. | नागपूर |
| | १९१ | २२. | पाली |
| | १९२ | २३. | राजसमंद |
| | १९३ | २४. | सिकर |
| | १९४ | २५. | सिरोही |
| तामिळनाडू | १९५ | १. | कोईम्बटोर |
| | १९६ | २. | धर्मपुरी |
| | १९७ | ३. | डिंडीगुल |
| | १९८ | ४ | करुर |
| | १९९ | ५. | कृष्णगिरी |
| | २०० | ६. | नमक्कल |
| | २०१ | ७ | पेरांबूर |
| | २०२ | ८. | पुदुकोट्टाई |
| | २०३ | ९. | रामनाथपुरम |
| | २०४ | १०. | सालेम |
| | २०५ | ११. | सिवगंगा |
| | २०६ | १२. | तिरुचिरापल्ली |
| | २०७ | १३ | तिरुनेलवेल्ली |
| | २०८ | १४. | तिरुवन्नमलाई |
| | २०९ | १५. | थोटुकुडी |

| | | | |
|---|---|---|---|
| | २१० | १६. | वेल्लोर |
| | २११ | १७. | विरुदुनगर |
| उत्तर प्रदेश | २१२ | १. | अलाहाबाद |
| | २१३ | २. | बहराइच |
| | २१४ | ३. | बलरामपूर |
| | २१५ | ४. | बांदा |
| | २१६ | ५. | चित्रकूट |
| | २१७ | ६. | हमीरपुर |
| | २१८ | ७. | जलौन |
| | २१९ | ८. | झाशी |
| | २२० | ९. | लखीमपुर खेरी |
| | २२१ | १०. | ललितपूर |
| | २२२ | ११. | महोबा |
| | २२३ | १२. | मिर्झापूर |
| | २२४ | १३. | श्रावस्ती |
| | २२५ | १४. | सितापुर |
| | २२६ | १५. | सोनभद्रा |
| उत्तराखंड | | | |
| | २२७ | १. | अल्मोरा |
| | २२८ | २. | बागेश्वर |
| | २२९ | ३. | चमोली |
| | २३० | ४. | चंपावती |
| | २३१ | ५. | पौरी गढवाल |
| | २३२ | ६. | पिठोरगढ |
| | २३३ | ७. | टेहरी गढवाल |
| पश्चिम बंगाल | | | |
| | २३४ | १. | बांकुरा |
| | २३५ | २. | बिरभूम |
| | २३६ | ३. | मिदनापूर पश्चिम |
| | २३७ | ४. | पुरुलिया |
| जिल्ह्यांची एकुण संख्या | | २३७ जिल्हे | |